# मराठीत लिहित्या हातांची संख्या कमी : पाटील

**पुणे, ता. ८ :** ''भौतिक प्रगती झाली असली, तरी बुद्धिमत्ता आणि ज्ञानाची कास धरली पाहिजे. १९६० च्या दशकात मराठीमध्ये बिनीचे लेखक होते, तशी परिस्थिती सध्या नाही. लिहिते हात कमी झाले आहेत,'' अशी खंत प्रसिद्ध साहित्यिक विश्वास पाटील यांनी शनिवारी व्यक्त केली. या प्रक्रियेत नवनिर्मितीपासून दूर जाण्याचा धोका दिसत असून, लिहिते हात शोधून त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, असेही ते म्हणाले.

'बुकगंगा डॉट कॉम'तर्फे पाटील यांच्या बहुभाषिक साहित्याच्या 'ई-बुक्स'चे प्रकाशन संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, बुकगंगा डॉट कॉमचे मंदार जोगळेकर उपस्थित होते.

पाटील म्हणाले, ''माझी पुस्तके रेल्वे स्टेशनवर पायरसी झालेली पाहिली. त्या वेळी लेखक आणि प्रकाशकांना त्याविरुद्ध संघटित करण्याचा प्रयत्न केला. 'पायरसी करून का होईना लोक तुझे साहित्य वाचतात यातच आनंद वाटला पाहिजे,' असे मला सांगण्यात आले. आता ई-बुकच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती जगाच्या वेशीवर जात असल्याचा आनंद होत आहे. भाषेची चिंता व्यक्त होताना ज्ञानोबा-तुकोबांची मराठी भाषा विविध वाहिन्यांच्या माध्यमातून दीडशे देशांमध्ये पोचली याचे समाधान वाटते.''

माय मराठाची पताका माझ्या परीने यथाशक्ती नाचविण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारी नोकरीच्या व्यापामध्ये खूप लिहिले, असा दावा करणार नाही; पण अजून बरेच लेखन करायचे असून, पुन्हा एकदा मला 'शब्दांच्या गोकुळा'त परतायचे आहे, अशी भावना पाटील यांनी व्यक्त केली.

भटकर म्हणाले, ''भाषांचे वैविध्य ही भारताची समृद्धी आहे. तंत्रज्ञानाचा अंगीकार न करणाऱ्या भाषा काळाच्या प्रवाहात लुप्त होणार आहेत. त्यामुळे मुद्रित पुस्तकापेक्षाही भविष्यातील ई-बुक हे माध्यम स्वस्त आणि सोयीचे ठरणार असून, त्यातून साहित्याचा प्रसार होऊ शकेल.'' जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अरुण नूलकर यांनी सूत्रसंचालन केले.